## MAHARASHTRA ACT No. XL OF 1961.

## AN ACT TO REPEAL THE HYDERABAD PUBLIC LIBRARIES ACT, 1955.

## सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४०.

[राज्यपाल यांची संमति मिळाल्यानंतर, "महाराष्ट्र सरकारच्या राजपत्रांत" दिनांक २७ सप्टेंबर १९६१ रोजीं प्रथम (इंग्रजींत) प्रसिद्ध केलेला.].

### हैदराबाद सार्वजनिक ग्रंथालयें अधिनियम, १९५५, रद्द करण्याबाबत अधिनियम.

ज्याअर्थी, हैदराबाद सार्वजनिक ग्रंथालयें अधिनियम, १९५५, हा रद्द करणें इष्ट आहे ; त्याअर्थी भारतीय गणराज्याच्या बाराव्या वर्षी याद्वारें पुढीलप्रमाणें अधिनियम करण्यांत येत आहे :—

**लघु संज्ञा व प्रारंभ.**

१. (१) ह्या अधिनियमास हैदराबाद सार्वजनिक ग्रंथालयें (रद्द करण्याबाबत) अधिनियम, १९६१, असें म्हणावें.

(२) तो राज्य सरकार राजपत्रांतील अधिसूचनेद्वारें जी तारीख नेमून देईल त्या तारखेस अंमलांत येईल.

सन १९५५चा हैदराबाद अधिनियम क्रमांक ३, हा रद्द करणें.

२. हैदराबाद सार्वजनिक ग्रंथालयें अधिनियम, १९५५ (ज्यास यांत यापुढें "उक्त अधिनियम" असें म्हटलें आहे), हा याद्वारें रद्द करण्यांत येत आहे.

स्थानिक ग्रंथालय प्राधिकारी संस्था विघटित करणें, ग्रंथालय निधि संचित निधींत जमा करणें, आणि अशा प्राधिकारी संस्थेची इतर मालमत्ता कलेक्टरकडे निहित होणें.

३. ह्या अधिनियमाच्या प्रारंभापासून,—

(अ) उक्त अधिनियमान्वयें स्थापन करण्यांत आलेली प्रत्येक स्थानिक ग्रंथालय प्राधिकारी संस्था ही विघटित करण्यांत आली असल्याचें समजण्यांत येईल आणि अशा संस्थेच्या सदस्यांनीं पद रिकामें केलें पाहिजे ;

(ब) उक्त अधिनियमाच्या कलम १३ अन्वयें स्थानिक ग्रंथालय प्राधिकारी संस्थेनें ठेवलेला ग्रंथालय निधि बंद करण्यांत येईल आणि अशा प्रारंभाच्या निकटपूर्वी अशा कोणत्याहि निधींत जमा असलेली शिल्लक रक्कम राज्याच्या संचित निधींत जमा करण्यांत आली पाहिजे ; आणि

(क) उक्त अधिनियमान्वयेंच्या अशा कोणत्याहि स्थानिक ग्रंथालय प्राधिकारी संस्थेंत निहित असलेली सर्व स्थावर आणि जंगम मालमत्ता आणखी हस्तांतरण न करतां कलेक्टरकडे निहित होईल, आणि राज्य सरकार इतर रीतीनें निदेश देईपर्यंत ती त्याजकडे अशा रीतीनें निहित असण्याचें चालू राहील.

(True translation)
P. S. THORAT,
Examiner of Books and Publications, Bombay.

२०६

## MAHARASHTRA ACT No. XLI OF 1961.

### THE BOMBAY REVENUE TRIBUNAL (AMENDMENT) ACT, 1961.

महाराष्ट्र विधानमंडळाच्या पुढील अधिनियमास राष्ट्रपति यांची संमति दिनांक ३० सप्टेंबर १९६१ रोजीं मिळालेली असल्यामुळें तो याद्वारें सर्व लोकांच्या माहितीसाठीं प्रसिद्ध करण्यांत येत आहे.

बी. पी. दलाल,
महाराष्ट्र सरकारचे सचिव,
विधि व न्याय विभाग.